**ISSN: Print: 2347-5021 www.research-chronicler.com ISSN: Online: 2347-503X**

# पनवेल तालुक्यातील 'कातकरी' या आदिम जमातीचे आर्थिक अध्ययन

**श्री.एच.एस.खरात**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग
जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे,
चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स स्वायत्त महाविद्यालय,
नविन पनवेल – रायगड (महाराष्ट्र)

गोषवारा

विकसनशील भारताची तंत्रज्ञान, विज्ञान यातील दैदीप्यमान प्रगती एकविसाव्या शतकात विकसित राष्ट्रांकडे घेऊन जात असताना, त्या रथात आरुढ झालेल्या भारतीय समाजातील प्रत्येक घटक केवळ साक्षर होणे इतकेच अपेक्षित नसून त्याने सुशिक्षित नागरिक होणे गरजेचे आहे. उदरनिर्वाहाची साधने प्राप्त झाल्यानंतर मानवाने खेड्यात व सुधारलेल्या लोकवस्तीत राहणे पसंत केले. परंतु काही भूमी पुत्रांनी या सर्व लोकवस्तीपसून दूर व दुर्गम भागात असलेल्या डोंगरकपारीत आपला तळ ठोकला. आपल्याच रूढी व परंपरांना पालीसारख्या चिटकून राहणाऱ्या फळाफुलांच्या, झाडापाल्याच्या चवीने समाधान पावणाऱ्या आदिवासी / जनजाती / वनवासी जमातीचे जीवन स्वच्छंदी पाखरासारखे असते. या समाजाला जंगलचे राजे, धरतीची लेकरे, आदिम जमाती, आदिवासी समाज, वनवासी बांधव, जनजाती बांधव असा उल्लेख केला जातो. आजही आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होत असली, तरीही अनेक सुख सुविधांपासून वंचित असा हा समाज दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा व वेठबिगारी यांच्या अंधारात भटकत डोंगरकपारीत खडतर जीवन जगत आहे. अशा या समाजाची आर्थिक, सामाजिक, स्थिती समजून घेणे आवश्यक आहे. रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुका हे औद्योगिकदृष्ट्या एक विकसित शहर आहे. पनवेलचा परिसर हा औद्योगिक परिसर, विकसित परिसर म्हणून नावारूपाला आला आहे. पण पनवेल तालुक्याचा १० ते १२ टक्के लोकसंख्या दुर्गम, डोंगराळ भागात वास्तव्य करणारा आदिवासी समाज आहे. आजही हा समाज उपेक्षेचे जीवन जगत आहे. पनवेलचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर या समाजाच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्यासाठी विकास योजना राबविणे आवश्यक आहे. आदिवासी लोक आर्थिक प्रगतीच्या विविध पातळीवर आहेत. त्यामुळे त्यांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. आदिवासींचे प्रश्न नेमके कोणते आणि ते कसे सोडविता येतील याविषयी सातत्याने चर्चा होत असतात.

बिजसंज्ञा :- आदिम, कातकरी, स्थलांतर, रोजगार निर्मिती.

- प्रस्तावना :-

कातकरी जमात ही महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहणारी एक वन्य जमात आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता महाराष्ट्रात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. त्यापैकी कातकरी (मुख्यत: रायगड व

ठाणे), कोलाम (यवतमाळ), माडिया गोंड (गडचिरोली) या तीन जमातींचा केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून समावेश केला. त्यापैकीच एक मी संशोधन कार्यासाठी निवडलेली अनुसूचित आदिम जमात म्हणजे 'कातकरी' होय. या जमातीला कातकरी, काथवडी, काथोडी या विविध नावांनी संबोधले जाते. कातकऱ्यांच्या एकूण ९३ कुळी आढळतात. कुळी म्हणजे त्यांची आडनावेच आहेत. महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या १,०५,१०,२१३ इतकी असल्याचे २०११ च्या जनगणनेनुसार लक्षात येते. महाराष्ट्रातील ठाणे, पालघर, रायगड, पुणे, नाशिक, रत्नागिरी, सातारा या जिल्ह्यात जमातीची लोकसंख्या बहुसंख्येने आहे, तर अन्य जिल्ह्यात कमी प्रमाणात असल्याचे आढळून येते. कातकरी खऱ्या अर्थाने जंगलवासी आहेत. कारण ते एकाच जागी न थांबता उदरनिर्वाहासाठी, अन्नासाठी वणवण फिरतात.

कातकरी जमातीच्या उत्पतीविषयी विविध तज्ञांनी अनेक विचार मांडले. आदिवासींमध्ये कातकरी हा ठाण्याचा आद्य मानव मानला जात असे. या जमातीची वस्ती अनादी काळापासून आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते, काथोडी इ. स. पूर्व ५००० ते ६००० वर्षे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहत असावेत. कृत्ती म्हणजे कातडे व पट्टीन म्हणजे ते वापरणारा, यावरून 'कृतीपट्टीन' या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन कातवडी (अंगावर प्राण्यांचे कातडे घातलेला) नाव पडले असावे. आपली उत्पती रामाच्या वानरसेनेपासून झाली असे कातकरी सांगतात, तर खैराच्या झाडापासून काथ तयार करण्याच्या त्यांच्या धंद्यावरून त्यांना नाव पडले असे तज्ञ म्हणतात.

कातकरी जमातीच्या लघु संशोधनात्मक अभ्यास कार्यासाठी पनवेल तालुक्यातील १६ वाड्यांचा अभ्यास प्राथमिक सर्वेक्षणाद्वारे करण्यात आला. आज रायगड जिल्ह्यातील कातकरी जमातीची १,१९,५७३ इतकी असल्याचे २०११ च्या जनगणनेनुसार दिसून येते. यामधील जवळपास ३० ते ३५ टक्के लोकसंख्या ही पनवेल तालुक्यात वास्तव्य करीत असल्याचे दिसून आले. पनवेल तालुक्याचा विचार करता, पनवेलचा बहुतांश भाग हा नवी मुंबईत समाविष्ट होतो आहे. त्याचबरोबर आज झपाट्याने होणाऱ्या विकासाची गती कातकरी समुदायासाठी उपयुक्त ठरतेय का? याचा देखील शोध या लघुसंशोधन कार्यातून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

- उद्दिष्ट्ये :-

१. कातकरी जमातीच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.
२. कातकरी जमातीतील स्थलांतराचा अभ्यास करणे.

- गृहितकृत्ये :-

१. कातकरी समाजामध्ये दारिद्र्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे आर्थिक स्थिती खालावलेली आहे.
२. या जमातीमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार प्राप्तीसाठी स्थलांतर घडून येते.

- अभ्यास क्षेत्र :-

कातकरी जमातीच्या लघु संशोधनात्मक आर्थिक स्थितीच्या अभ्यास कार्यासाठी पनवेल तालुक्यातील १६ वाड्यांचा अभ्यास प्राथमिक सर्वेक्षणाद्वारे करण्यात आला.

- माहिती संकलनाचे स्रोत :-

प्राथमिक स्रोतांच्या आधारे केलेले माहितीचे संकलन ही संशोधन कर्त्याची खरी कसोटी असते. मी स्वतः पनवेल तालुक्यातील १६ गावांना / वाड्यांना प्रत्यक्ष भेट देऊन निरीक्षण, अनुसूची आणि मुलाखत या तंत्राचा वापर करून अधिक माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक पाड्यांवरील कमीतकमी १० कुटुंबाना प्रत्यक्ष भेट देऊन अनुसूचीच्या साह्याने माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पनवेल तालुक्यातील कातकरी या आदिम जमातीचे आर्थिक अध्ययन करण्यासाठी कातकरी समुदायातील विविध पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, विविध तज्ञांनी लिहिलेले संशोधन लेख, जनगणना अहवाल, यांचा संदर्भ म्हणून वापर अर्थात द्वितीयक स्रोत म्हणून करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वेबसाइट्स, इंटरनेटच्या साह्यानेही देखील माहितीचे संकलन करण्यात आलेले आहे.

- **कातकरी जमातीची आर्थिक स्थिती :-**

आर्थिक विकासात 'उत्पन्न' हा महत्वपूर्ण घटक मानला जातो. उत्पन्न या महत्वपूर्ण घटकावर समाजाचे राहणीमान अवलंबून असते. उत्पन्न अधिक असेल तर विकास कार्यात प्रगती होते आणि उत्पन्न कमी असेल तर विकास प्रक्रियेला खीळ बसते. श्रमनिष्ठेच्या संस्कारामधूनच उत्पन्नाची प्राप्ती होत असते. ग्रामीण भारताचा सन्मान करून 'पुनर्रचनेसह विकास' **(Development With Restoration)** हे तत्व अवलंबण्यात येते. चिरकालीन विकासाचा रस्ता केवळ याच मार्गावरून जाऊ शकतो आणि यशस्वी होऊ शकतो. पण कातकरी या आदिम जमातीच्या रोजगाराच्या साधनांचा विचार करता, या समाजात मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी असल्याचे प्रत्ययास येते. रायगड जिल्हा हा पश्चिमेकडील अरबी समुद्र व पूर्वेकडील सह्याद्रीच्या रांगा यामुळे भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. रायगड जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ११.५८% लोकसंख्या आदिवासी बांधवांची आहे. यापैकी ४०% लोकसंख्या कातकरी बांधवांची आहे. शासन स्तरावरुन आदिवासींचा आर्थिक, सामाजिक विकास करण्याकरिता अनेक योजना राबविल्या जातात. परंतु तरीही, आदिवासी बांधव अनेक सोयी-सुविधांपासून वंचित आहेत. या बांधवांच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत खालीलप्रमाणे सांगता येतील.

❖ उत्पन्नाचे मुख्य स्रोत खालीलप्रमाणे

अ) नोकरी :-

आज देशात कृषी, उद्योग क्षेत्रातील उत्पन्नापेक्षा सेवा क्षेत्रातील उत्पन्न हे मोठ्या प्रमाणावर प्राप्त होत आहे. मात्र पनवेल तालुक्यातील कातकरी बांधवांची स्थिती सेवा क्षेत्रात अत्यंत हलाखीची असल्याचे संशोधनाच्या अभ्यासातून प्रत्ययास आले.

सेवा क्षेत्रातील नोकरदार वर्गाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात येते.

i) सरकारी नोकरी :

कातकरी जमातीची केंद्र शासनाने अत्यंत आदिम जमात म्हणजे गरीबातील गरीब जमात म्हणून घोषणा केली. आजही या जमातीची आर्थिक स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे प्रत्ययास आले. संशोधन अध्ययनातून असे निदर्शनास आले की, १५८ कुटुंबांधील फक्त ४ कुटुंबातील ४ व्यक्ती या सरकारी क्षेत्रात कार्यरत असल्याचे दिसून आले. यामध्ये १ प्राथमिक शिक्षक, १ वनपाल, १ आकाशवाणी केंद्र सहाय्यक आणि १ शालेय चतुर्थ श्रेणी कर्मचारी असे वर्गीकरण करण्यात आले. म्हणजे हे प्रमाण २.५३% इतके अगदी नगण्य असल्याचे दिसून आले. प्रामुख्याने कातकरी या आदिम जमातीचा समावेश **अनुसूचित जमातीमध्ये** असून देखील ही जमात शासकीय नोकऱ्यांपासून वंचित असल्याचे दिसून आले.

ii) खाजगी नोकरी :

१६ पाड्यांमधील अनुसूचीच्या साह्याने अध्ययन केल्यानंतर विविध कंपन्या, उद्योग, कारखाना, तळोजा एम.आय.डी.सी, खाजगी बँका, किराणा दुकान कर्मचारी आणि खाजगी दवाखाना यामध्ये साधारणपणे २५ इतकी संख्या कार्यरत असल्याचे दिसून आले.

ब) शेती :-

१६ पाड्यांमधून स्वत;च्या मालकीच्या जमीनीवर शेती करणारे, दुसऱ्यांच्या शेतीवर अर्ध्या हिस्स्याने शेती केली जाते. १५८ कुटुंबापैकी फक्त २३ कुटुंबे ही स्वत:च्या किंवा दुसऱ्यांच्या शेतावर शेती प्रामुख्याने भातशेती करत असल्याचे दिसून आले.


क) मोलमजुरी :-

कातकरी बांधव विशेषत: मोलमजुरीच्या माध्यमातून स्वत:चा उदरनिर्वाह करीत असल्याचे दिसून आले. यामध्ये प्रामुख्याने हमाल धक्यांवर मजुरीसाठी जाणे, आजूबाजूच्या पाड्यांवर, गावांमध्ये मजूर म्हणून काम करणे, पेंटिंगसाठी बाहेर मजूर म्हणून जाणे, बांधकामक्षेत्रात गवंडी यांच्या हाताखाली मजूर म्हणून जाणे, फार्महाऊसवर इत्यादी क्षेत्रात हे बांधव मोलमजुरी करतात. अध्ययन केलेल्या कुटुंबापैकी १०३ मजुर मजुरीसाठी कार्यरत असल्याचे दिसून आले. उत्पन्नाच्या स्रोतांपैकी सर्वाधिक मोलमजुरीचे प्रमाण दिसून आले.

ड) व्यवसाय/धंदा (किराणा) :-

'कातकरी' या जमातीमधील बांधवांचे व्यवसाय किंवा धंदा यामध्ये अत्यल्प प्रमाण असल्याचे प्रत्ययास आले. साधारणत: फक्त ३ कुटुंबाकडे छोट्या ३ प्रकारची किराणा दुकाने होती. त्यामधून प्राप्त होणारे उत्पन्न देखील तूटपुंज्य मिळत असल्याचे सभासदधारकांनी कबूल केले.

| उत्पन्नाचे स्रोत | कुटुंबांची संख्या |
|---|---|
| सरकारी नोकरी | ०४ (२.५३%) |
| खाजगी नोकरी | २५ (१५.८२%) |
| शेती | २३ (१४.५६%) |
| मोलमजुरी | १०३ (६५.१९%) |
| व्यवसाय / धंदा (किराणा) | ०३ (१.९०%) |
| एकूण | १५८ |





**उत्पन्नाचे स्रोत**

वरील तक्ता आणि स्तंभालेखावरून प्रामुख्याने सूचित करण्यात येते की, उत्पन्नाचे स्रोत दर्शविलेले आहेत. यामध्ये कातकरी बांधवांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण असून देखील सरकारी नोकऱ्यांत अत्यल्प प्रमाण दिसून येते. तर मोलमजुरी हाच त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत दिसून येतो.

- **कुटुंबांची वार्षिक उत्पन्नाची वर्गवारी**

| वार्षिक उत्पन्न (रुपये) | कुटुंबसंख्या |
|---|---|
| रु. १०००० पेक्षा कमी | २३ (१४.५६%) |
| रु. १०००० - २०००० | २१ (१३.२९%) |
| रु. २०००० - ३०००० | १७ (१०.७६%) |
| रु. ३०००० - ४०००० | ४३ (२७.२२%) |
| रु. ४०००० - ५०००० | ३५ (२२.१५%) |
| रु. ५०००० पेक्षा जास्त | १९ (१२.०२% |
| एकूण | १५८ |

वरील तक्त्यांमध्ये १५८ कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची वर्गवारी दर्शविलेली आहे.




❖ उत्पन्नाचे दुय्यम स्रोत खालीलप्रमाणे

अ) वीटभट्टी :-

पनवेल तालुक्यातील खूप मोठ्या प्रमाणात कातकरी बांधव स्थलांतराच्या माध्यमातून वीटभट्टीवर कार्यरत असतात. कत्यी लोकसंख्येच्या प्रमाणात साधारणपणे १७.०९% (२७ कुटुंबे) ही वीटभट्टी या उद्योगात कार्यरत असल्याचे निदर्शनास आले. दीपावलीनंतर साधारणत: नोव्हेंबर ते जून या महिन्यात वीटभट्टी हा व्यवसाय केला जातो. या उर्वरित काळात वीटभट्टी या व्यवसायापासून कातकरी समुदायास रोजगार प्राप्त झाला.

ब) वनभाज्या (रानभाज्या) विक्री :-

कातकरी समुदायाचे प्रामुख्याने जंगलांशी घनिष्ठ सबंध असतात. त्यामुळेच त्यांना जंगलचे राजे म्हणतात. आपल्या जीवनातील बराचसा कालावधी जंगलामध्ये राहून व्यतीत करतात. बहुतांश कुटुंबातील सदस्य महिला या जून ते सप्टेंबर या कालावधीत विविध वनभाज्या जंगलातून गोळा करून गावाच्या मुख्य ठिकाणी, शहराच्या ठिकाणी जाऊन वनभाज्यांची विक्री करून तुटपुंज्य प्रमाणात उत्पन्न प्राप्त करतात. यामध्ये प्रामुख्याने कुळई, ताईत (शेंडवाल), काठमाठ, कुई इत्यादी रानभाज्यांच्या विक्रीतून उत्पन्न प्राप्त होते. साधारणत: १६ महिला या रानभाज्यांच्या विक्रीतून उत्पन्न मिळवितात.

क) मत्स्य / खेकडे विक्री :-

कातकरी समुदायाच्या आहारात मांसाहाराचा समावेश प्रामुख्याने होतो. त्यानुसार हे बांधव पावसाळ्यात खेकडे, मुठे, मासे पकडून त्यांची गावामध्ये किंवा शहराच्या ठिकाणी जाऊन विक्री करतात. तसेच छोट्या, मोठ्या नद्यांमधून उन्हाळ्यात पाण्याचा उपसा करून मासे पकडून त्यांची विक्री करतात. तसेच हे बांधव स्वत:च्या आहारात देखील अधिकाधिक प्रमाणात वापर करतात.

संशोधनाच्या माध्यमातून १० व्यक्तींना मत्स्य विक्रीतून अल्प प्रमाणात उत्पन्न उपलब्ध होते.


ड) मळा (भाजीपाला उत्पादन) :-

कातकरी समुदायातील बहुतांश कुटुंबे ही नद्यांच्या, धरणांच्या किनाऱ्यावर वसलेली दिसून येतात. त्यामुळे पाण्याची उपलब्धतता विचारात घेऊन प्रामुख्याने भाजीपाल्याचे उत्पादन केले जाते. यामध्ये प्रामुख्याने काकडी. शिराळी, भेंडी, गवार, दुधी इत्यादी भाजीपाल्याचे उत्पादन करून त्याची आजूबाजूच्या गावांमध्ये विक्री केली जाते. किंबहुना पनवेल भाजी मार्केटमध्ये देखील विक्री केली जाते. भाजीपाल्याचे उत्पादन करणारी ११ कुटुंबे असल्याचे लक्षात आले.

- उत्पन्नाच्या दुय्यम स्रोतांमधील उत्पन्नाचे प्रमाण

| उत्पन्नाचे दुय्यम स्रोत | कुटुंबसंख्या |
|---|---|
| वीटभट्टी | २७ (१७.०९%) |
| वनभाज्या (रानभाज्या) | १६ (१०.१३%) |
| मत्स्य / खेकडे विक्री | १० (६.३३%) |
| मळा | ११ (६.९६%) |
| एकूण | ६४ (४०.५१%) |

वरील तक्त्यांमध्ये कातकरी बांधव हे प्रामुख्याने मोलमजुरीबरोबरच काही ना काही प्रमाणात दुय्यम उत्पन्न थोड्याफार प्रमाणात मिळवीत असल्याचे दिसून आले. दुय्यम उत्पन्न मिळविणाऱ्यांचे प्रमाण ४०.५१% असल्याचे दिसून आले.



❖ ४.७. स्थलांतर हेच रोजगार निर्मितेचे :-

कातकरी बांधवांमध्ये स्थलांतराची प्रक्रिया खूप मोठ्या प्रमाणावर दिसून येते. अभ्यासाअंती जवळजवळ ३१ कुटुंबे ही वर्षभराच्या कालावधीत साधारणत: ५ ते ६ महिन्यांच्या कालावधीसाठी आपला पाडा/गाव सोडून जातात. यामधील २४ कुटुंबे ही प्रामुख्याने वीटभट्टीवर रोजगार प्राप्तीसाठी स्थलांतर करतात. थोडक्यात विटभट्टीवरील स्थलांतराचे १५.१८% इतके प्रमाण आहे. उर्वरित ७ कुटुंबे ही प्रामुख्याने बांधकाम क्षेत्रातील रोजगारासाठी ठेकेदाराकडे मजुरीच्या निमित्ताने स्थलांतर करतात. स्थलांतरित कुटुंबे ही वेठबिगारीसारखे जीवन जगत असतात. स्थलांतरित होणारी कुटुंबे पूर्णच्या पूर्ण कुटुंबे मुला बाळांसह स्थलांतर करतात. हे स्थलांतर सर्वेक्षण केलेल्या कुटुंबाच्या १९.६२% असल्याचे प्रत्ययास आले. थोडक्यात हा समुह रोजगार निर्मितीसाठी अधिकाधिक प्रमाणात स्थलांतर करतो.

❖ निष्कर्ष :-

कातकरी या आदिम जमातीतील १५८ कुटुंबांना प्रत्यक्ष भेट दिल्यानंतर पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतील.

१. कातकरी या जमातीची आर्थिक परिस्थिती दयनीय असल्याचे अभ्यासातून दिसून आले. फक्त १२.०२% (१९ कुटुंबांचे) उत्पन्न ५०००० रुपयापेक्षा अधिक असल्याचे दिसून आले. तर उर्वरित कुटुंबे ही तुटपुंज्य उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह चालवितात.
२. कातकरी या आदिम जमातीमध्ये रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर कुटुंबासह स्थलांतर घडून येते. हेच स्थलांतराचे प्रमाण १९.६२% असल्याचे प्रत्ययास आले.
३. या जमातीचे रोजगार निर्मितीसाठी होणाऱ्या स्थलांतरात प्रामुख्याने वेठबिगारीची समस्या निर्माण होत असल्याचे दिसून आले.

❖ सारांश :-

कातकरी ही आदिम जमात आजही तुटपुंज्य उत्पन्नावर आपला उदरनिर्वाह चालवीत असल्याचे संशोधनातून दिसून आले. खूप मोठ्या प्रमाणावर ही जमात आपली भटकंती करून उदरनिर्वाह चालवीत असल्याचे प्रत्ययास आले.

संदर्भ :-

१. महाराष्ट्रातील आदिवासी – डॉ. शौनक कुलकर्णी - डायमंड पब्लिकेशन्स – प्रथम आवृत्ती – २००९.
२. आदिवासी संस्कृती – प्रा. डॉ. पुष्पा यशवंत गावित – अथर्व पब्लिकेशन्स – प्रथमावृत्ती – १७ ऑक्टोबर,२०१४
३. विश्व वनवासींचे – डॉ. भास्कर गिरधारी – भारतीय विचार साधना पुणे – प्रथमावृत्ती – १ जानेवारी, २०१८
४. मी कातकरी – श्री. कृष्णा कातकरी – विष्णू महादेव कुलकर्णी प्रकाशन – डिसेंबर – २०१९

५. कातकरी विकास कि विस्थापन – मौज प्रकाशन
६. Research Methodology – C.R.Kothari and Gaurav Garv – New Age International Publishers – Fourth Multi Colour Edition – 2019
७. Rohit Mutatkar - Poverty & Deprivation among the katkari Vol.52, IssueNo.13, 1 April, 2017
८. Save the Katkari - Indigenous Forest Tribe of Maharashtra, India - Erik Adamserik_adams@start.com.au
९. Kulkarni &Deshpande : Folk therapies of katkaris from Maharashtra – Indian Journal of Traditional Knowledge – Vol. 10 ( 3 ), July 2011 Page No. 554-558.